SMBT

# April 2024 Month News Coverage

SMBT

# शालेय विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे

## बालरोगतज्ज्ञ संघटना- 'एसएमबीटी'चा शंभर शाळांत उपक्रम

**लोकनामा प्रतिनिधी**

> लहानग्यांपासून ते मोठ्यांमध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, व्यसनाधीनता, मानसिक आजार व रोगप्रतिकारशक्ती कमी-कमी होत चालली आहे. भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटनेच्या कार्यास पाठिंबा देत 'एसएमबीटी'कडून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती झाली तर ते संपूर्ण घराचा कायापालट करू शकतात, या उद्देशाने विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाणार आहे.
>
> **- डॉ. मीनल मोहगावकर,** अधिष्ठाता,
> एसएमबीटी मेडिकल सेंटर, नाशिक

**नाशिक** : बालवयीन व पौगंडावस्थेतील मुलांचे आरोग्य निरोगी, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या दृष्टिकोनातून नंदी हिल्स येथील प्रियदर्शनी इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे देण्यात आले. 'भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना' व एसएमबीटी वैद्यकीय महाविद्यालय यांच्यात झालेल्या करारानुसार 'संकल्प : संपूर्ण स्वास्थ्य'अंतर्गत शंभर शाळांमधील विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे दिले जात आहेत.




या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आरोग्यदायक सवयींचे प्रशिक्षण देण्यासाठी सर्व शाळांचे सबलीकरण करणे, विद्यार्थी मोठे झाल्यावर त्यांना जीवनशैलीशी निगडित असलेले आजार, आरोग्यदायक सवयी लावणे, दैनंदिन व्यायाम, मोबाईल, टीव्ही वगैरे साधनांचा कमीत कमीत वापर, मानसिक आरोग्य सुधारणे, आनंददायी वातावरण ठेवणे, अशा प्रकारचे प्रशिक्षण शालेय विद्यार्थ्यांना देऊन शाळा हे आरोग्य संवर्धनाचे साधन व्हावे, या उद्देशाने प्रशिक्षण दिले जात आहे.

या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव म्हणून अतिरिक्त साखर व मिठाचे प्रमाण असलेल्या अनेक खाद्यपेयांबाबत चर्चा झाली. प्रशिक्षण समन्वयक व एसएमबीटीमधील बालरोग विभागाच्या डॉ. भुतडा यांनी, हा प्रशिक्षण कार्यक्रम विद्यार्थी पूर्ण करून नक्कीच दैनंदिन जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणू शकतात, असा विश्वास व्यक्त केला.

एसएमबीटी वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, संघटना राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उपेंद्र किंजवडेकर, डॉ. रेखा हरिष, डॉ. दीपक पांडे, आयएपी ईबी सदस्य व ज्युपिटर हॉस्पिटलचे मुख्य बालरोग अतिदक्षता तज्ज्ञ डॉ. परमानंद आंदणकर, नाशिकच्या ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. शर्मिला कुलकर्णी, एसएमबीटीचे बालरोग विभागप्रमुख डॉ. नितीन मेहकरकर, संघटना समन्वयक डॉ. स्वाती भुतडा यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

सायं. दैनिक **प्रवरातीर** विकासाचा पुरस्कार-अन्यायाचा तिरस्कार

दि. ०९ एप्रिल २०२४

मो-९९७०९६८३९९

SMBT

# 'प्रियदर्शनी'च्या विद्यार्थ्यांनी घेतली 'संकल्पः संपूर्ण स्वास्थ्य'ची शपथ

## भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना व एसएमबीटी मेडिकल कॉलेजतर्फे दिले जाणार १०० शाळांमधील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

नंदी हिल्स (प्रतिनिधी)- बालवयीन व पौगंडावस्थेतील मुलांचे आरोग्य निरोगी, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यादृष्टीकोनातून नंदी हिल्स येथील प्रियदर्शनी इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे देण्यात आले. 'भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना' व एसएमबीटी मेडिकल कॉलेज यांच्यात झालेल्या करारानुसार संकल्पः संपूर्ण स्वास्थ्य अंतर्गत १०० वेगवेगळ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे दिले जात आहेत. याप्रसंगी एसएमबीटी मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उपेंद्र किंजवडेकर, डॉ. रेखा हरीश, डॉ. दीपक पांडे, आयएपी ईबी सदस्य व ज्युपिटर हॉस्पिटलचे मुख्य बालरोग अतिदक्षता तज्ज्ञ डॉ परमानंद आंदणकर, नाशिकच्या ज्येष्ठ बालरोगतज्ञ डॉ शर्मिला कुलकर्णी, एसएमबीटीचे बालरोग विभागप्रमुख डॉ नितीन मेहकरकर, संघटनेच्या समन्वयक डॉ. स्वाती भुतडा यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. 'भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना' ही जगातील




सर्वात मोठी बालरोगतज्ज्ञ संघटना असून या संघटनेचे ४२ हजार सदस्य आहेत. ही संघटना भारतातील बालवयीन व पौगंडावस्थेतील मुलांच्या सर्वांगीण आरोग्यासाठी कार्य करते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आरोग्यकारक सवयींचे प्रशिक्षण देण्यासाठी सर्व शाळांचे सबलीकरण करणे, विद्यार्थी मोठे झाल्यावर त्यांना जीवनशैलीशी निगडित असलेले आजार- उदा. स्थूलपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, तसेच यकृत, मूत्रपिंड यांचे आजार व विविध प्रकारचे कर्करोग इ. होण्याचा धोका कमी व्हावा यासाठी आरोग्यकारक सवयी लावणे. विद्यार्थ्यांच्या चौरस आहार २. जंक फूड (सत्त्वहीन पदार्थ) टाळण्यासाठी जनजागृती, दैनंदिन व्यायाम, मोबाईल, टी.व्ही. वगैरे साधनांचा कमीत कमीत वापर, मानसिक आरोग्य सुधारणे, आनंददायी वातावरण ठेवणे, पुरेशी व गाढ झोप घेणे, व्यसनांपासून दूर राहणे, प्रदूषण रोखणे अशा प्रकारचे प्रशिक्षण शालेय विद्यार्थ्यांना देऊन शाळा हे आरोग्य संवर्धनाचे साधन व्हावे या उद्देशाने प्रशिक्षण दिले जात आहे. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव म्हणून अतिरिक्त साखर व मिठाचे प्रमाण असलेल्या अनेक खाद्यपेयांबाबत चर्चा झाली. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समन्वयक व एसएमबीटीमधील बालरोग विभागाच्या डॉ भुतडा यांनी हा प्रशिक्षण कार्यक्रम विद्यार्थी पूर्ण करून नक्कीच दैनंदिन जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणू शकतात असा विश्वास व्यक्त केला. आपल्याही भागातील शाळेत हा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावयाचा असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. चौकट जनजागृती गरजेची दिवसेंदिवस लहानग्यांपासून मोठ्यांमध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, व्यसनाधीनता, मानसिक आजार व रोगप्रतिकारशक्ती कमी-कमी होत चालली आहे. 'भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटनेच्या कार्यास पाठींबा देत एसएमबीटीकडून १०० शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. यासाठी एसएमबीटी मेडिकल कॉलेजचे शिक्षक, डॉक्टर्स, आरोग्य सेवक यांना प्रशिक्षण देण्यात आले असून लवकरच या कार्यक्रमास सुरुवात होईल. विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती झाली तर ते संपूर्ण घराचा कायापालट करू शकतात या उद्देशाने विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाणार आहे. डॉ मीनल मोहगावकर अधिष्ठाता, एसएमबीटी मेडिकल सायन्सेस अण्ड रिसर्च सेंटर नंदी हिल्स, इगतपुरी, नाशिक.

# ठाणेवैभव

## 'प्रियदर्शनी'च्या विद्यार्थ्यांनी घेतली 'संकल्पः संपूर्ण स्वास्थ्य'ची शपथ

**ठाणे:** बालवयीन व पौगंडावस्थेतील मुलांचे आरोग्य निरोगी, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीकोनातून नंदी हिल्स येथील प्रियदर्शनी इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे देण्यात आले.

'भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना' व एसएमबीटी मेडिकल कॉलेज यांच्यात झालेल्या करारानुसार संकल्पः संपूर्ण स्वास्थ्य अंतर्गत 100 वेगवेगळ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे दिले जात आहेत. याप्रसंगी एसएमबीटी मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उपेंद्र किंजवडेकर, डॉ. रेखा हरीश, डॉ. दीपक पांडे, आयएपी ईबी सदस्य व ज्युपिटर हॉस्पिटलचे मुख्य बालरोग अतिदक्षता तज्ज्ञ डॉ परमानंद आंदणकर, नाशिकच्या ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ शर्मिला कुलकर्णी, एसएमबीटीचे बालरोग विभागप्रमुख डॉ नितीन मेहकरकर, संघटनेच्या समन्वयक डॉ. स्वाती भुतडा यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

'भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना' ही जगातील सर्वात मोठी बालरोगतज्ज्ञ संघटना असून या संघटनेचे 42 हजार सदस्य आहेत. ही संघटना भारतातील बालवयीन व पौगंडावस्थेतील मुलांच्या सर्वांगीण आरोग्यासाठी कार्य करते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आरोग्यकारक सवयींचे प्रशिक्षण देण्यासाठी सर्व शाळांचे सबलीकरण करणे, विद्यार्थी मोठे झाल्यावर त्यांना जीवनशैलीशी निगडित असलेले आजार उदा. स्थूलपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, तसेच यकृत, मूत्रपिंड यांचे आजार व विविध प्रकारचे कर्करोग इ. होण्याचा धोका कमी व्हावा यासाठी आरोग्यकारक सवयी लावणे. विद्यार्थ्यांचा चौरस आहार, जंक फूड (सत्त्वहीन पदार्थ) टाळण्यासाठी जनजागृती, दैनंदिन व्यायाम, मोबाईल, टी.व्ही. वगैरे साधनांचा कमीत कमीत वापर, मानसिक आरोग्य सुधारणे, आनंददायी वातावरण ठेवणे, पुरेशी व गाढ झोप घेणे, व्यसनांपासून दूर राहणे, प्रदूषण रोखणे अशा प्रकारचे प्रशिक्षण शालेय विद्यार्थ्यांना देऊन शाळा हे आरोग्य संवर्धनाचे साधन व्हावे या उद्देशाने प्रशिक्षण दिले जात आहे.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव म्हणून अतिरिक्त साखर व मिठाचे प्रमाण असलेल्या अनेक खाद्यपेयांबाबत चर्चा झाली. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समन्वयक व एसएमबीटीमधील बालरोग विभागाच्या डॉ भुतडा यांनी हा प्रशिक्षण कार्यक्रम विद्यार्थी पूर्ण करून नक्कीच दैनंदिन जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणू शकतात असा विश्वास व्यक्त केला. आपल्याही भागातील शाळेत हा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावयाचा असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




### जनजागृती गरजेची

दिवसेंदिवस लहानग्यांपासून मोठ्यांमध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, व्यसनाधीनता, मानसिक आजार व रोगप्रतिकारशक्ती कमी-कमी होत चालली आहे. 'भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटनेच्या कार्यास पाठींबा देत एसएमबीटीकडून 100 शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. यासाठी एसएमबीटी मेडिकल कॉलेजचे शिक्षक, डॉक्टर्स, आरोग्य सेवक यांना प्रशिक्षण देण्यात आले असून लवकरच या कार्यक्रमास सुरुवात होईल. विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती झाली तर ते संपूर्ण घराचा कायापालट करु शकतात या उद्देशाने विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाणार आहे, अशी माहिती एसएमबीटी मेडिकल सायन्सेस अण्ड रिसर्च सेंटर नंदी हिल्स, इगतपुरीच्या अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर यांनी दिली.


Main Edition
Apr 7, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com


# लोकमत

## विद्यार्थ्यांनी घेतली संपूर्ण स्वास्थ्याची शपथ

### बालरोगतज्ज्ञ संघटना व एसएमबीटीतर्फे दिले जाणार प्रशिक्षण

इगतपुरी : पौगंडावस्थेतील मुलांचे आरोग्य निरोगी असावे, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टिकोनातून येथील प्रियदर्शनी इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे देण्यात आले. भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना व एसएमबीटी मेडिकल कॉलेज यांच्यात झालेल्या करारानुसार संकल्पः संपूर्ण स्वास्थ्य अंतर्गत १०० वेगवेगळ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे दिले जात आहेत.

याप्रसंगी एसएमबीटी मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उपेंद्र किंजवडेकर, डॉ. रेखा हरीश, डॉ. दीपक पांडे, आयएपी ईबी सदस्य व ज्युपिटर हॉस्पिटलचे मुख्य बालरोग अतिदक्षता तज्ज्ञ डॉ परमानंद आंदणकर, नाशिकच्या ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ शर्मिला कुलकर्णी, एसएमबीटीचे बालरोग विभागप्रमुख डॉ नितीन मेहकरकर, संघटनेच्या समन्वयक डॉ. स्वाती भुतडा यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित हो

एसएमबीटीमधील बालरो
विभागाच्या डॉ. भुतडा यांनी
प्रशिक्षण कार्यक्रम विद्यार्थी पू
करून जीवनात बदल घडवून आ
शकतात असा विश्वास व्यक्त केल



भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना व एसएमबीटीकडून १०० शाळांमध्ये जाऊ
विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. यासाठी एसएमबीटी मेडिकल
कॉलेजचे शिक्षक, डॉक्टर्स, आरोग्य सेवकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

**- डॉ. मीनल मोहगावकर,** अधिष्ठा
एसएमबीटी मेडिकल सायन्सेस अण्ड रिसर्च सेंटर, इगतपु


Nashik Main
Page No. 2 Apr 09, 2024
Powered by: erelego.com

नवराष्ट्र

SMBT

संकल्प • भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना व एसएमबीटी मेडिकल कॉलेजतर्फे १०० शाळांमध्ये प्रशिक्षण

# विद्यार्थ्यांनी घेतली संपूर्ण स्वास्थ्याची शपथ

**नाशिक,** (वा.) बालवयीन व पौगंडावस्थेतील मुलांचे आरोग्य निरोगी, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीकोनातून नंदी हिल्स येथील प्रियदर्शनी इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे देण्यात आले. भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना व एसएमबीटी मेडिकल कॉलेज यांच्यात झालेल्या करारानुसार संकल्प : संपूर्ण स्वास्थ्य अंतर्गत १०० वेगवेगळ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे दिले जात आहेत.

याप्रसंगी एसएमबीटी मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उपेंद्र किंजवडेकर, डॉ. रेखा हरीश, डॉ. दीपक पांडे, आयएपी ईबी सदस्य व ज्युपिटर हॉस्पिटलचे मुख्य बालरोग अतिदक्षता तज्ज्ञ डॉ. परमानंद आंदणकर, नाशिकच्या ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. शर्मिला कुलकर्णी, एसएमबीटीचे बालरोग विभागप्रमुख डॉ. नितीन मेहकरकर, संघटनेच्या समन्वयक डॉ. स्वाती भुतडा यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




## व्यसनांपासून दूर राहणे, प्रदूषण रोखण्याचे संघटनेतर्फे प्रशिक्षण

'भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना' ही जगातील सर्वात मोठी बालरोगतज्ज्ञ संघटना असून, तिचे ४२ हजार सदस्य आहेत. ही संघटना भारतातील बालवयीन व पौगंडावस्थेतील मुलांच्या सर्वांगीण आरोग्यासाठी कार्य करते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आरोग्यकारक सवयींचे प्रशिक्षण देण्यासाठी सर्व शाळांचे सबलीकरण करणे, विद्यार्थी मोठे झाल्यावर त्यांना जीवनशैलीशी निगडित असलेले आजार उदा. स्थूलपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, तसेच यकृत, मूत्रपिंड यांचे आजार व विविध प्रकारचे कर्करोग इ. होण्याचा धोका कमी व्हावा यासाठी आरोग्यकारक सवयी लावणे. विद्यार्थ्यांचा चौरस आहार मिळावा व जंक फूड टाळण्यासाठी जनजागृती, दैनंदिन व्यायाम, मोबाईल, टीव्ही वगैरे साधनांचा कमीतकमी वापर, मानसिक आरोग्य सुधारणे, आनंददायी वातावरण ठेवणे, पुरेशी व गाढ झोप घेणे, व्यसनांपासून दूर राहणे, प्रदूषण रोखणे अशा प्रकारचे प्रशिक्षण शालेय विद्यार्थ्यांना देऊन शाळा हे आरोग्य संवर्धनाचे साधन व्हावे,या उद्देशाने प्रशिक्षण दिले जात आहे.

## अनेक खाद्यपेयांबाबत झाली चर्चा

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव म्हणून अतिरिक्त साखर व मिठाचे प्रमाण असलेल्या अनेक खाद्यपेयांबाबत चर्चा झाली. समन्वयक डॉ. भुतडा यांनी हा प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करून विद्यार्थी नक्कीच दैनंदिन जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणू शकतात, असा विश्वास व्यक्त केला. आपल्याही भागातील शाळेत हा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावयाचा असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

> दिवसेंदिवस लहानग्यांपासून मोठ्यांमध्ये विविध आजार व रोगप्रतिकारशक्ती कमी-कमी होत चालली आहे. संघटनेच्या कार्यास पाठिंबा देत एसएमबीटीकडून १०० शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. यासाठी कॉलेजचे शिक्षक, डॉक्टर्स, आरोग्य सेवक यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, लवकरच या कार्यक्रमास सुरुवात होईल. विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती झाली तर ते संपूर्ण घराचा कायापालट करू शकतात या उद्देशाने विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाणार आहे.- **डॉ. मीनल मोहगावकर**, अधिष्ठाता, एसएमबीटी मेडिकल कॉलेज, इगतपुरी.

Nashik Plus Edition
08 April 2024 Page No. 4
epaper.navarashtra.com

देशदूत

# विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे

## एसएमबीटी मेडिकल कॉलेज व बालरोगतज्ज्ञ संघटनेचा उपक्रम

**नाशिक | दि. ६ प्रतिनिधी**



बालवयीन व पौगंडावस्थेतील मुलांचे आरोग्य निरोगी, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या दृष्टिकोनातून नंदी हिल्स येथील प्रियदर्शनी इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे देण्यात आले.

भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना व एसएमबीटी मेडिकल कॉलेज यांच्यात झालेल्या करारानुसार संकल्पः संपूर्ण स्व-ास्थ्य अंतर्गत १०० विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे दिले जात आहेत. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उपेंद्र किंजवडेकर, डॉ. रेखा हरीश, डॉ. दीपक पांडे, आयएपी ईबी सदस्य व ज्युपिटर हॉस्पिटलचे मुख्य बालरोग अतिदक्षता तज्ज्ञ डॉ परमानंद आंदणकर, नाशिकच्या ज्येष्ठ बालरोगतज्ञ डॉ शर्मिला कुलकर्णी, एसएमबीटीचे बालरोग विभागप्रमुख डॉ नितीन मेहकरकर, संघटनेच्या समन्वयक डॉ. स्वाती भुतडा यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. ङ्गविद्यार्थ्यांना आहार, दैनंदिन व्यायाम, मोबाईल, टी. व्ही. वगैरे साधनांचा कमीत कमीत वापर, मानसिक आरोग्य सुधारणे, आनंददायी वातावरण ठेवणे, पुरेशी व गाढ झोप घेणे, व्यसनांपासून दूर राहणे, प्रदूषण रोखणे अशा प्रकारचे प्रशिक्षण शालेय विद्यार्थ्यांना देऊन शाळा हे आर-ोग्य संवर्धनाचे साधन व्हावे या उद्देशाने प्रशिक्षण दिले जात आहे. डॉ. भुतडा यांनी हा प्रशिक्षण कार्यक्रम विद्यार्थी पूर्ण करून नक्कीच दैनंदिन जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणू शकतात असा विश्वास व्यक्त केला. आपल्याही भागातील शाळेत हा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावयाचा असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

Deshdoot Edition
Apr 9, 2024 Page No. 10
Powered by : eReleGo.com

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

# 'संकल्प : संपूर्ण स्वास्थ्य'ची शपथ

**संगमनेर (प्रतिनिधी)** – बालवयीन व पौगंडावस्थेतील मुलांचे आरोग्य निरोगी, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीकोनातून नाशिक जिल्ह्यातील नंदी हिल्स येथील प्रियदर्शनी इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे देण्यात आले. भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना व एसएमबीटी मेडिकल कॉलेज यांच्यात झालेल्या करारानुसार संकल्पः संपूर्ण स्वास्थ्य अंतर्गत १०० वेगवेगळ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे दिले जात आहेत.

याप्रसंगी एसएमबीटी मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉ.मीनल मोहगावकर, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उपेंद्र किंजवडेकर, डॉ. रेखा हरिश, डॉ.दीपक पांडे, आयएपी ईबी सदस्य व ज्युपिटर हॉस्पिटलचे मुख्य बालरोग अतिदक्षता तज्ज्ञ डॉ. परमानंद आंदणकर, नाशिकच्या ज्येष्ठ बालरोगतज्ञ डॉ. शर्मिला कुलकर्णी, एसएमबीटीचे बालरोग विभागप्रमुख डॉ. नितीन मेहकरकर, संघटनेच्या समन्वयक डॉ.स्वाती भुतडा यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

Sarwamat Edition
Apr 9, 2024 Page No. 2
Powered by : eReleGo.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com



नाशिक : 'संकल्पः संपूर्ण स्वास्थ्य' अंतर्गत निरोगी आरोग्याचे धडे घेतेवेळी विद्यार्थी.

# 'प्रियदर्शनी' विद्यार्थ्यांकडून स्वास्थ्याची शपथ

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

नंदी हिल्स येथील प्रियदर्शनी इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे देण्यात आले. भारतीय बालरोग तज्ज्ञ संघटना व एसएमबीटी मेडिकल कॉलेज यांच्यात झालेल्या करारानुसार 'संकल्पः संपूर्ण स्वास्थ्य' अंतर्गत १०० वेगवेगळ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्याचे धडे दिले जात आहेत.

याप्रसंगी एसएमबीटी मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उपेंद्र किंजवडेकर, डॉ. रेखा हरीश, डॉ. दीपक पांडे, ज्युपिटर हॉस्पिटलचे मुख्य बालरोग अतिदक्षता तज्ज्ञ डॉ. परमानंद आंदणकर, बालरोग तज्ज्ञ डॉ. शर्मिला कुलकर्णी, एसएमबीटीचे बालरोग विभागप्रमुख डॉ. नितीन मेहकरकर, संघटनेच्या समन्वयक डॉ. स्वाती भुतडा आदी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आरोग्यकारक सवयींचे प्रशिक्षण देण्यासाठी सर्व शाळांचे सबलीकरण करणे, विद्यार्थी मोठे झाल्यावर त्यांना जीवनशैलीशी निगडित असलेल्या आजारांचा धोका कमी व्हावा, यासाठी आरोग्यकारक सवयी लावणे. विद्यार्थ्यांचा चौरस आहार असणे, जंक फूड (सत्त्वहीन पदार्थ) टाळण्यासाठी जनजागृती, दैनंदिन व्यायाम, मोबाइल, टीव्ही वगैरे साधनांचा कमीत कमीत वापर, मानसिक आरोग्य सुधारणे, आनंददायी वातावरण ठेवणे, पुरेशी व गाढ झोप घेणे, व्यसनांपासून दूर राहणे, प्रदूषण रोखणे अशा प्रकारचे प्रशिक्षण शालेय विद्यार्थ्यांना देऊन शाळा हे आरोग्य संवर्धनाचे साधन व्हावे, या उद्देशाने प्रशिक्षण दिले जात आहे. दरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव म्हणून अतिरिक्त साखर व मिठाचे प्रमाण असलेल्या अनेक खाद्यपेयांबाबत चर्चा झाली

Nashik Edition
Apr 8, 2024 Page No. 11
Powered by: erelego.com

SMBT

